शुक्रवार, १३ फेब्रुवारी २००४ **तरुण भारत**




**कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना माजी खासदार उदयसिंगराव गायकवाड. शेजारी व्यासपीठावर संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, गरूडसाहेब.**

# कमला महाविद्यालयात पारितोषिक वितरण

कोल्हापूर ■

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये २००३-०४ सालामध्ये गौरवपूर्ण कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना बक्षिसाचे वितरण माजी खासदार उदयसिंगराव गायकवाड यांच्या हस्ते संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष रा. कृ. कणबरकर (माजी कुलगुरू) यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी करून दिला. तेव्हा कमला महाविद्यालयाने दोन दशकामध्ये कला, साहित्य, क्रीडा, एन.एस.एस. व एन.सी.सी. या विभागात केलेल्या प्रगतीचा इतिहास मांडला. यानंतर वार्षिक अहवाल वाचन प्रा. डॉ. भारती शेळके यांनी केले.

उदयसिंगराव गायकवाड म्हणाले की, या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात केलेले कार्य भारावून टाकणारे आहे. आज राजकारणात व समाजकारणात अनेक स्त्रियांनी नेत्रदीपक कार्य केलेले आहे. ताराराणीचा आदर्श घेऊन तुम्ही तुमचे व्यक्तिमत्व आदर्शवत घडविले पाहिजे. जीवनाच्या विविध क्षेत्रात स्वकर्तृत्वाने चमकले पाहिजे. समाजामध्ये वाढत चाललेला भ्रष्टाचार उखडून काढण्याचे सामर्थ्य शिक्षणाने दिले पाहिजे तर खेळाने धैर्य व स्वत:चे संरक्षण करण्याचे सामर्थ्य दिले पाहिजे.

यावेळी संस्थेचे हितचिंतक विश्वासराव बागल यांनी आपल्या पत्नी कै. सुलेखा बागल यांच्यानावे गरीब व होतकरू विद्यार्थिनींसाठी प्रत्येक वर्षी २५ हजार रूपयाची शिष्यवृत्ती जाहीर केली. याप्रसंगी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर म्हणाले की, कमला महाविद्यालयात समाजाची बांधिलकी मानणारी, केवळ स्वत:साठी न जगता समाजासाठी जगणारी, समाजसेवेचा विसर न पडणारी विद्यार्थिनी घडली पाहिजे, हा या शिष्यवृत्तीमागचा हेतू आहे. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर, उत्तमराव काळे, विविध शाखाप्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. बक्षीसपात्र विद्यार्थिनींच्या नावाची घोषणा प्रा. वर्षा मैंदर्गी यांनी केली तर आभार प्रा. ए. एल. नरके यांनी मानले.